पावती | Original/Duplicate

Thursday,November 26 ,2015
2:01 PM

नोंदणी क्र. :39म
Regn.:39M

पावती क्र.: 10963 दिनांक: 26/11/2015

गावाचे नाव: देहूगांव
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: हवल18-9448-2015
दस्तऐवजाचा प्रकार : बक्षीसपत्र
सादर करणाऱ्याचे नाव: श्री सुनिल उर्फ भोलानाथ पंढरीनाथ काळोखे

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 740.00 |
| पृष्ठांची संख्या: 37 | |
| एकूण: | रु. 30740.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ व सीडी अंदाजे
2:18 PM ह्या वेळेस मिळेल.

सह दुय्यम निबंधक, हवेली-18

बाजार मुल्य: रु.18792000 /-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 500/-

मोबदला: रु.0/-

सह-दुय्यम निबंधक
हवेली क्र.१८,(वर्ग २),पुणे

1) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH005100466201516E दिनांक: 26/11/2015
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: By Cash रक्कम: रु 740/-
मुद्रांक शुल्क माफी असल्यास तपशिल :-
1) शालेय संस्थांना बक्षिस, व्यवस्थापत्र आणि ट्रस्टडिड : शासन अधिसूचना महसूल व वनविभाग क्रमांक एसटीपी-१३६८ म-१ दि. २९/१०/५८.

Principal
Four-S English Medium School

सचिव
संत शिरोमणी शिक्षण संस्था
देहूगांव, ता. हवेली, जि. पुणे

(अ)

Index-2( सूची - २ )

26/11/2015

सूची क्र.2

दुय्यम निबंधक : सह दु.नि. हवेली 18
दस्त क्रमांक : 9448/2015
नोदंणी :
Regn:63m

गावाचे नाव : 1) देहूगांव

| | |
|---|---|
| (1)विलेखाचा प्रकार | बक्षीसपत्र |
| (2)मोबदला | 0 |
| (3) बाजारभाव(भाडेपटटयाच्या बाबतितपटटाकार आकारणी देतो की पटटेदार ते नमुद करावे) | 18792000 |
| (4) भू-मापन,पोटहिस्सा व घरक्रमांक (असल्यास) | 1) पालिकेचे नाव:पुणे इतर वर्णन :, इतर माहिती: अ). गाव मौजे देहूगाव ता हवेली जि पुणे येथील सर्व्हे नं. 43/7 यांसी एकुण क्षेत्र 01 हे. 56 आर पोटखराबायामह यांसी आकार 03 रू. 81 पैसे पैकी बक्षिसपत्र लिहून देणार यांचे मालकीचे पूर्वेकडिल 00 हे. 40 आर क्षेत्रफळाची मिळकत.ब). गाव मौजे देहूगाव ता हवेली जि पुणे येथील सर्व्हे नं. 42/10 यांसी एकुण क्षेत्र 00 हे. 47 आर पोटखराबायासह यांसी आकार 01 रू. 25 पैसे पैकी बक्षिसपत्र लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र 00 हे. 35.5 आर पैकी उत्तरेकडील 00 हे. 15 आर क्षेत्रफळाची मिळकत.( जी आर नं. STP 1364 दि 29/10/1954 )( ( Survey Number : 43/7 व 42/10 ; ) ) इतर हक्क : |
| (5) क्षेत्रफळ | 1) 0.55 NA पोटखराब क्षेत्र : 0 NA |
| (6)आकारणी किंवा जुडी देण्यात असेल तेव्हा. | |
| (7) दस्तऐवज करुन देणा-या/लिहून ठेवणा-या पक्षकाराचे नाव किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश असल्यास,प्रतिवादिचे नाव व पत्ता. | 1): नाव:-श्री सुनिल उर्फ भोलानाथ पंढरीनाथ काळोखे वय:-60; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: देहूगाव पुणे, रोड नं: -, महाराष्ट्र, पुणे. पिन कोड:-412109 पॅन नं:- |
| (8)दस्तऐवज करुन घेणा-या पक्षकाराचे व किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश असल्यास,प्रतिवादिचे नाव व पत्ता | 1): नाव:-संत शिरोमणी शिक्षण संस्था तर्फे उपाध्यक्ष श्री पवन सुनिल काळोखे वय:-33; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: देहूगाव पुणे, रोड नं: -, महाराष्ट्र, पुणे. पिन कोड:-412109 पॅन नं:-<br>2): नाव:-संत शिरोमणी शिक्षण संस्था तर्फे सचिव श्री गुरु सुनील काळोखे वय:-29; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: देहूगाव पुणे, रोड नं: -, महाराष्ट्र, पुणे. पिन कोड:-412109 पॅन नं:- |
| (9) दस्तऐवज करुन दिल्याचा दिनांक | 26/11/2015 |
| (10)दस्त नोंदणी केल्याचा दिनांक | 26/11/2015 |
| (11)अनुक्रमांक,खंड व पृष्ठ | 9448/2015 |
| (12)बाजारभावाप्रमाणे मुद्रांक शुल्क | 500 |
| (13)बाजारभावाप्रमाणे नोंदणी शुल्क | 30000 |
| (14)शेरा | |

मी नक्कल वाचली
मी तजूवात घेतली

दस्तासोबत नक्कल
श्री/श्री पवन काळोखे
यांना दिली.
दिनांक २६/११/२०१५

असलावर हुकुम नक्कल
सह-दुय्यम निबंधक
हवेली क्र.१८,(वर्ग-२),पुणे

मुल्यांकनासाठी विचारात घेतलेला तपशील:-:

मुद्रांक शुल्क आकारताना निवडलेला अनुच्छेद :- : (i) within the limits of any Municipal Corporation or any Cantonment area annexed to it.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR OF HAVELI

Principal
Four-S English Medium School

सचिव
संत शिरोमणी शिक्षण संस्था
देहूगांव, ता. हवेली, जि. पुणे

**CHALLAN**
**MTR Form Number-6**

| | | | |
|---|---|---|---|
| **GRN** MH005100466201516E | **BARCODE** | **Date** 26/11/2015-11:07:20 | **Form ID** |
| **Department** Inspector General Of Registration | | **Payer Details** | |
| **Type of Payment** Registration Fee | | **TAX ID (If Any)** | |
| Ordinary Collections IGR | | **PAN No. (If Applicable)** | |
| **Office Name** HVL1_HAVELI NO1 SUB REGISTRAR | | **Full Name** | SUNIL ALIAS BHOLANATH P KALOKH E |
| **Location** PUNE | | | |
| **Year** 2015-2016 One Time | | **Flat/Block No.** | S. NO. 43/7 AREA 40 R |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | **Premises/Building** | |
| 0030063301 Amount of Tax | 30000.00 | **Road/Street** | S. NO. 42/10 AREA 15 R |
| | | **Area/Locality** | DEHUGAON PUNE |
| | | **Town/City/District** | |
| | | **PIN** | 4 1 2 1 0 9 |
| | | **Remarks (If Any)** | SecondPartyName=SANT SHIROMANI SHIKSHAN SANSTHA~ |
| | | **Amount In Words** | Thirty Thousand Rupees Only |
| **Total** | 30000.00 | | |
| **Payment Details** BANK OF MAHARASHTRA | | **FOR USE IN RECEIVING BANK** | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN / REF No. | 02300042015112675749 290082282 |
| Cheque/DD No | | Date | 26/11/2015-11:07:53 |
| Name of Bank | | Bank-Branch | BANK OF MAHARASHTRA |
| Name of Branch | | Scroll No. , Date | Not Verified with Scroll |

Mobile No. : Not Available

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR OF

हवल - १८
२०८९ | ७ | ३८
२०१५

Principal
Four-S English Medium School

सचिव
संत शिरोमणी शिक्षण संस्था
देहूगांव, ता. हवेली, जि. पुणे

Summary-2( दस्त गोषवारा भाग - २ )

मूल्यांकन पत्रक (प्रभाव क्षेत्र-खुली जमीन )

Valuation ID : 201511261102 | 26 November 2015 01:38:34 PM

| | |
|---|---|
| मूल्यांकनाचे वर्ष : | 2015 |
| जिल्हा : | पुणे |
| तालुका : | हवेली |
| गावाचे नाव : | मौजे : देहू |
| क्षेत्राचे नांव : | Influence Area |
| मुल्य विभाग/उपमुल्य विभाग : | 11/0 |
| सर्वे नंबर/ गट नंबर | 43 |
| मिळकतीचा प्रकार | खुली |
| मिळकतीचे क्षेत्र | 5500 चौ. मीटर Bulk Land |
| वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार जमिनीचा दर | Rs.4320/- |
| | प्रथम विक्री |

1. 500चौ. मीटर क्षेत्रासाठी वार्षिक मूल्य दरावर 100 % मूल्य दर =4320/-

500चौ. मीटर क्षेत्रासाठी मुल्यांकन = 500*4320

=2160000/-

2. 1500चौ. मीटर क्षेत्रासाठी वार्षिक मूल्य दरावर 90 % मूल्य दर =3888/-

1500चौ. मीटर क्षेत्रासाठी मुल्यांकन = 1500*3888

=5832000/-

3. 2000चौ. मीटरक्षेत्रासाठी वार्षिक मूल्य दरावर 80 % मूल्य दर =3456/-

2000चौ. मीटर क्षेत्रासाठी मुल्यांकन = 2000*3456

=6912000/-

4. 1500चौ. मीटरक्षेत्रासाठी वार्षिक मूल्य दरावर 60 % मूल्य दर =2592/-

1500चौ मीटर क्षेत्रासाठी मुल्यांकन = 1500*2592

=3888000/-

जमीनीचे एकत्रित अंतिम मुल्य = मिळकतीचे क्षेत्र 1 मूल्य + मिळकतीचे क्षेत्र 2 मूल्य+ मिळकतीचे क्षेत्र 3 मूल्य+ मिळकतीचे क्षेत्र 4 मूल्य

=2160000 + 5832000 + 6912000 + 3888000

= Rs.18792000/-

Home | Print

JOINT SUB REGISTRAR OF... दुय्यम निबंधक हवेली-१८

हवल - १८
९००५ | २ | ३८
२०१६

Principal
Four-S English Medium School

सचिव
संत शिरोमणी शिक्षण संस्था
देहूगांव, ता. हवेली, जि. पुणे

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 — FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये — Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2015 © W 393811

अनु.क्र. ६३२८ दि. २३/११/२०१५

दस्ताचा प्रकार बक्षिसपत्र

दस्त नोंदणी क्र.

मिळकतीचे

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव संत शिरोमणी शिक्षण संस्था

पत्ता ...... [illegible]

दुसऱ्या पक्षकाराचे नाव [illegible]

हस्ते व्यक्तीचे [illegible] ४८ शनिवार पेठ

23 NOV 2015

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

श्री. [illegible] मिलिंद [illegible]
परवाना क्र. २२०१०११
४२५ प, शनिवार पेठ, पुणे-३०

॥ श्री ॥

= बक्षिसपत्र =

दि. २४/११/२०१५.

हवेली - १८
१०४८ | ३ | ३८
२०१६

Principal
Four-S English Medium School

JOINT SUB-REGISTRAR CLASS 2, हवेली

| | | |
|---|---|---|
| ह व ल - १८ | | |
| [illegible] | ४ | ३८ |
| २०१७ | | |

|| श्री गजानन प्रसन्न ||

**बक्षिसपत्र**

सदर बक्षिसपत्र पुणे मुक्कामी आज वार मंगळवार दिनांक २८ माहे नोव्हेंबर सन २०१७ रोजी इसवी ते दिवशी.

संत शिरोमणी शिक्षण संस्था )
पत्ता.देहूगांव, तालुका हवेली, जिल्हा पुणे )
तर्फे )

१) श्री. पवन सुनिल काळोखे. (उपाध्यक्ष) )
वय - ३३ वर्षे, धंदा - व्यवसाय )
२) श्री.गुरु सुनिल काळोखे.(सचिव) )
वय - ३३ वर्षे, धंदा - व्यवसाय
दोघे रा.देहूगांव, तालुका हवेली, जिल्हा पुणे. )

.....बक्षिसपत्र लिहून घेणार

यांसी

श्री. सुनिल उर्फ भोलानाथ पंढरीनाथ काळोखे )
वय- ६० वर्षे, धंदा-व्यापार )
रा.देहूगांव, तालुका हवेली, जिल्हा पुणे. )

.....बक्षिसपत्र लिहून देणार

कारणे विनाअट, विनामोबदला बक्षिसपत्र लिहून देतो की,

१) मिळकतीचे वर्णन :-

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, जिल्हा पुणे व मे. सब रजिष्ट्रार साहेब हवेली यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती हवेली यांचे कार्यक्षेत्रातील व ग्रामपंचायत श्री. क्षेत्र देहूगांव यांचे अधिकार कक्षेतील, गांव मौजे देहूगांव येथील येथील-
अ) सर्व्हे नं. ४३/७ यांसी एकूण क्षेत्रफळ ०१ हे ५६ आर पोटखराबायासह यासी आकार ०३ रु. ८१ पैसे पैकी बक्षिसपत्र लिहून देणार यांचे मालकीचे पूर्वेकडिल,०० हे ४० आर क्षेत्रफळाची मिळकत या बक्षिसपत्राचा विषय आहे. यांसी चतु:सीमा पुढीलप्रमाणे :-

Principal
Four-S English Medium School

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR OF HAVELI NO.18
हवेली-१८
दस्त क्र. ५ / ३८
२०१५

पूर्वेस – याच मिळकती मधील १५ फुट रस्ता व पलिकडे वि.ज्ञा.काळोखे यांची मिळकत.

दक्षिणेस – श्री. चव्हाण यांची मिळकत.

पश्चिमेस – याच मिळकती मधिल उर्वरित क्षेत्र.

उत्तरेस – श्री. काळोखे यांची मिळकत.

ब) सर्व्हे नं. ४२/१० यांसी एकूण क्षेत्रफळ ०० हे ४७ आर पोटखराबायासह यासी आकार ०१ रु. २७ पैसे पैकी बक्षिसपत्र लिहून देणार यांचे मालकीचे ०० हे ३७.७ आर पैकी ~~१७~~ ००हे.१७ आर क्षेत्रफळाची मिळकत या बक्षिसपत्राचा विषय आहे. यांसी चतु:सीमा पुढीलप्रमाणे :-

पूर्वेस – श्री. चव्हाण यांची मिळकत.

दक्षिणेस – ~~रस्ता~~ याच मिळकती मधिल उर्वरित क्षेत्र

पश्चिमेस – ~~याच मिळकती मधिल उर्वरित क्षेत्र~~. सपकाळ यांची जमीन

उत्तरेस – श्री. ~~सपकाळ यांची मिळकत.~~ रस्ता

येणेप्रमाणे वर कलम १अ व ब यांत वर्णन केलेली मिळकत त्यातील दगड, माती, धोंडा, भेंडा, जल, तरु, तृण, काष्ठ, इत्यादी तदंगभूत वस्तूसहित व वहिवाटीच्या, इजमेंटच्या, रस्त्याच्या जाण्या-येण्याच्या हक्कासह मिळकती यापुढे सदर मिळकतीचा उल्लेख एकत्रितपणे या बक्षिसपत्रात ''सदरची मिळकत'' म्हणून केलेला आहे.

२) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत बक्षिसपत्र लिहून देणार श्री. सुनिल उर्फ भोलानाथ पंढरीनाथ काळोखे यांची स्वकष्टार्जीत खरेदी मालकीच्या व ताबे वहिवाटीच्या आहेत. त्याप्रमाणे लिहून देणार याच्या नावाची नोंद मिळकतीच्या ७/१२ वर फेरफार क्र. ४३०० व ४११७ अन्वये झालेली आहे. त्याप्रमाणे सदर मिळकातीची विल्हेवाट लावण्याचे संपुर्ण हक्क व अधिकार लिहून देणार यांना आहेत.

३) प्रस्तुत लिहून देणार हे संत शिरोमणी शिक्षण संस्थेचे (लिहून घेणार) चे कार्यकारणी सदस्य आहेत. सदरची संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे अधिनियम २१ अन्वये नोंदणी क्र. महाराष्ट्र /२८६/२००२/पुणे अन्वये दि. ०७/०३/२००२ रोजी संस्थाचे



Principal
Four-S English Medium School

दुनस - १८
दस्त ८ | ३८
२०१५

सहायक निबधक पुणे विभाग येथे नोंदणीकृत केलेले आहे व तसेच मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० ( सन १९५० मुंबई अधिनियम २९ ) या अन्वये पुणे विभाग पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यलात दि. २०/०८/२००२ रोजी नोंदणी क्र. एफ-१८२१३(पुणे) या अन्वये धर्मादाय उपाअयुक्त पुणे विभाग पुणे याच्याकडे नोंदलेली आहे.

४) सदर संस्थेची विशेष सर्वसाधरण सभा दि.०४/११/२०१७ रोजी संस्थेचे चालू असलेल्या शाळेची दर्जा वाढ करावयाची आसल्याने, संस्थेस जागेची आवश्यकता आसल्याने, जमिन विकत घेण्याबाबत झाली. सदरील सभे मध्ये संस्थेचे अध्यक्ष श्री. सुनिल उर्फ भोलानाथ पंढरीनाथ काळोखे म्हणजेच लिहून देणार यांनी वर कलम १ अ व ब मध्ये वर्णन . केलेली मिळकत लिहून घेणार संस्थेस विनामोबदला बक्षिस पत्राने देण्याची तयारी दर्शवली व तसा प्रस्ताव मांडला गेला व तो प्रस्त्ताव संस्थेच्या सर्व विस्वस्थानी बहुमताने मंजुर करण्यात आला. तसेच सदर लिहून घेणार श्री. पवन सुनिल काळोखे उपअध्यक्ष व श्री.गुरु सुनिल काळोखे.(सचिव) यांना सदरचे बक्षिस पत्र नोंदणीकृत करण्याचे अधिकार दिल्याबाबतचाही ठराव एक मताने मंजुर करण्यात आला.त्याप्रमाणे सदरचे बक्षिस पत्र लिहून घेणार व लिहून देणार आजरोजी नोंदणीकृत करीत आहेत. व सदर दस्ता सोबत संस्थेच्या उद्देशाबाबत, संस्थेची घटना जोडली आहे.

५) वर कलम १अ व ब यात वर्णन केलेली मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित असल्याची खात्री लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेली आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, उदा. गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, विसारपावती, साठेखत / करार मदार, कोर्ट डिक्री, कोर्टात वादाचा विषय, भाडेकरु / कूळ हक्क, ताबा, वहिवाट, लायसन्स, वारसा हक्क इ. नसल्याबाबतची खात्री लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेली आहे.

६) वर कलम १अ व ब यात वर्णन केलेली मिळकत कोणत्याही सरकारी, निमसरकारी कार्यालयाने तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेने कोणत्याही लोकोपयोगी कामासाठी आरक्षीत अगर संपादित



Principal
Four-S English Medium School

THE JOINT SUB-REGISTRAR OF HAVELI NO.18
दुय्यम निबंधक हवेली-१८

हवल - १८
१७७ | ७ | ३८
२०२५

केलेल्या नाहीत, अगर तशा नोटीसा आजतागायत लिहून देणार यांना मिळालेल्या नाहीत.

७) वर नमूद केल्यानुसार लिहून देणार यांनी त्यांचे ताब्यातील सदर मिळकतीचा प्रत्यक्ष व खुला ताबा लिहून घेणार यांना खालील साक्षीदारांसमक्ष प्रत्यक्ष हद्दी व खुणा दर्शवून तदंगभूत वस्तूसहित व वहिवाटीच्या / इजमेंटच्या हक्कासह आज रोजी बक्षिस म्हणून दिलेला आहे. लिहून घेणार यांनी सदर मिळकतीचा लिहून देणार यांचेकडून खुला व शांततामय ताबा बक्षिस म्हणून मिळाल्याचे मान्य केलेले आहे. त्याचा उपभोग वहिवाटीच्या / इजमेंटच्या हक्कासह व त्यातील तदंगभूत वस्तूसहित लिहून घेणार यांनी मालकी हक्काने वंशपरंपरागत पुत्र-पौत्रादी, निरंतरचा मन मानेल तसा घ्यावा अगर विल्हेवाट करावी त्यास लिहून देणार यांचे वालीवारस हरकत / आडकाठी करणार नाहीत अशी खात्री लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिली आहे.

८) सदर मिळकतीबाबतच्या सर्व सरकारी, निमसरकारी कर, पट्टया लिहून देणार यांनी भरलेल्या आहेत. कोणत्याही पट्टया, कर भरावयाचे राहीले असल्यास अगर कोणतेही सरकारी निमसरकारी देणे निघाल्यास ते दंडासह देण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहील. यापुढे लिहून घेणार यांनी सदर मिळकतीचे होणारे कर, पट्टया मालकी हक्काने भराव्यात.

९) लिहून देणार यांना वर कलम १अ ब यात वर्णन केलेली मिळकत बक्षिस देण्याबाबत कोणत्याही कायद्यान्वये प्रतिबंध करण्यात आलेला नाही. तसेच सदर मिळकत बक्षिस देण्यासाठी सरकारी अगर निमसरकारी अधिकाऱ्यांकडून परवानगी अगर दाखला मिळविण्याची जरुरी नाही.

१०) वर कलम १अ व ब यात वर्णन केलेली मिळकत लिहून घेणार यांचे नांवे सरकारी निमसरकारी कागदोपत्री, ७/१२ चे उताऱ्यावर मालक व कब्जेदार म्हणून दाखल होण्यासाठी तलाठी सर्कल अधिकारी, तहसिलदार यांचे कार्यालयात द्याव्या लागणाऱ्या जरुर त्या सह्या, लेखी व तोंडी जाब-जबाब, प्रतिज्ञापत्र, बॉन्ड लिहून देणार स्वखर्चाने कोणताही मोबदला न मागता देतील.

Principal
Four-S English Medium School

११) प्रस्तुतचे बक्षिसपत्रासाठी लागणारा संपूर्ण खर्च म्हणजेच स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी, वकील फी, टायपिंग, झेरॉक्स इ. तदनुषंगिक सर्व खर्च लिहून घेणार यांनी केलेला आहे.

१२) या बक्षिसपत्रान्वये बक्षिस दिलेल्या मिळकतीची योग्य ती मुद्रांक शुल्काची रक्कम रुपये -५००/- दिलेली आहे.

येणेप्रमाणे बक्षिसपत्र लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे नांवे आज रोजी आपले राजीखुषीने, अक्कलहुशारीने, कोणाचेही दडपणास अगर प्रलोभनास बळी न पडता खालील साक्षीदारांसमक्ष लिहून दिले आहे. सदर बक्षिसपत्र लिहून देणार व त्यांचे वालीवारस, नॉमिनीज / असाईनीज, ट्रान्सफरीज, इत्यादींवर कायमचे बंधनकारक राहील. लिहून देणार व लिहून घेणार यांनी या बक्षिसपत्रावर आज रोजी पुणे मुक्कामी आपआपल्या सह्या केलेल्या आहेत.

साक्षीदार :- फोटो/सही/अंगठा

१)
सही-
नांव- Erram Satish S
पत्ता- 6/607 Vakilnagar Erandwane Pune.



श्री. सुनिल उर्फ भोलानाथ पंढरीनाथ काळोखे
लिहून देणार

२)
सही-
नांव- श्रीकांत सुहास काळोखे
पत्ता- देहूगाव, पुणे.

संत शिरोमणी शिक्षण संस्था तर्फे



संत शिरोमणी शिक्षण संस्था
देहूगांव, ता. हवेली, जि.पुणे
उपाध्यक्ष
१) श्री. पवन सुनिल काळोखे.
(उपध्याक्ष)



संत शिरोमणी शिक्षण संस्था
देहूगांव, ता. हवेली, जि.पुणे
सचिव
२) श्री.गुरु सुनिल काळोखे.(सचिव)
लिहून घेणार



Principal
Four-S English Medium School

// श्री.गजानन प्रसन्न //

## संस्थेची घटना व नियमावली

### भाग – 1

1) संस्थेचे नाव :- संत शिरोमणी शिक्षण संस्था.

2) संस्थेचा पत्ता :- मु.पो. देहुगांव, तालुका हवेली, जिल्हा पुणे.

3) संस्थेचे कार्यक्षेत्र :- संपूर्ण महाराष्ट्र राज्य राहिल अगर कार्यकारी मंडळ निर्णय घेऊन राज्याचे बाहेर वाढवू शकेल.

4) संस्थेचे ध्येय व उद्देश :-

1) संस्थेचे ध्येय व उद्देश समाजातील सर्व मुला-मुलींना, निरक्षर लोकांना, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व गरीब व होतकरु मुला- मुलींना शिक्षण देणे.

2) शिक्षण देण्यासाठी शहरामध्ये, गावांमध्ये, खेड्यामध्ये लोकजागृती करुन लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून देणे.

3) बालवाडी, शिशुवर्ग, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन, तांत्रिक, अभियांत्रिकी, वैज्ञानिक, शेती, क्रिडा, व्यायाम शाळा, व्यावसायिक वर्ग चालू करणे.

4) लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी व लोकांना व्यवसायाभिमुख व आर्थिकदृष्ट्या सबळ होण्यासाठी इंग्रजी, मराठी, हिंदी व इतर भाषांमधून शिक्षण देणे.

5) शिक्षणासाठी शैक्षणिक ध्वनिफीत (कॅसेट), मासिके, पुस्तके, शैक्षणिक अभ्यास, व्यवसायमाला सुरु करणे व त्या अनुशंगाने साहित्य प्रकाशित करुन शिक्षणाचा प्रसार करणे.

6) कला, साहित्य, शास्त्र, वाणिज्य, शिक्षणासाठी तसेच शेती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, शारीरिक शिक्षण यासाठी निरनिराळ्या वेगवेगळ्या भाषांमधून शिक्षण देणे, शाखा संस्था उघडणे व संस्थेच्या मार्फत त्या चालविणे.

7) शैक्षणिक उन्नतीसाठी स्पर्धा भरविणे, उत्तेजनार्थ पारितोषिके ठेवणे, व्याख्याने ठेवणे.

8) राष्ट्रीय आपत्तीचे वेळी मदतकार्य करणे, प्रासंगिक व इतर प्रसंगी समाजहितोपयोगी कामे करणे.

9) सदर संस्थेचा कोणत्याही राजकीय संघटनेशी अगर पक्षाशी किंवा राष्ट्रविघातमक कारवाया करणा-या संघटनेशी संबंधित राहणार नाही. म्हणजेच सदर संघटना ही धर्मनिरपेक्षपणे शैक्षणिक कार्य करणारी राहणार आहे.

10) संस्थेचे बोधचिन्ह व बोधवाक्य कार्यकारी मंडळ ठरविल त्याप्रमाणे राहील.

..2/-

Principal
Four-S English Medium School

SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR OF HAVELI NO.18

हवेली - १८
२०१५



11) संस्थेचे आर्थिक वर्ष इंग्रजी महिन्याप्रमाणे 1 एप्रिलपासून सुरु होऊन ते 31 मार्चला संपणारे राहिल.

12) व्याख्या :-

1) संस्था म्हणजे संत शिरोमणी शिक्षण संस्था.

2) सभासद - संस्थेचा सभासद म्हणजे नियमावलीनुसार प्रवेश दिलेली व्यक्ती व जिने आपल्या सदस्यत्वाची वर्गणी दिली आहे.

3) कार्यकारी मंडळ :- संस्थेने स्थापन केलेले मंडळ.

4) घटना व नियम :- संस्थेची घटना व तयार केलेले नियम.

..3/-

Principal
Four-S English Medium School

भाग - 2

## सभासद, निवडणूका, सभा, उपसमित्या, कर्तव्ये इत्यादी

13) **संस्थेचे सभासद** :- सदर संस्था स्थापन करताना जे सभासद नमूद केलेले आहेत ते संस्थेचे आजिव सभासद राहतील

14) **हितचिंतक सभासद** :- कोणत्याहीनागरीकाने संस्थेचे सभासद होण्यासाठी अर्ज केल्यास व संस्थेने जे अटी व नियम केले असतील त्या पूर्ण व मान्य करणा-या नागरीकास संस्थेचे हितचिंतक सभासद म्हणून सभासदत्व दिले जाईल. मात्र त्यास कार्यकारी मंडळाचे मंजूरी मिळणे आवश्यक आहे.

15) **हितचिंतक सभासदत्वाच्या अटी** :- संस्थेचे सभासद होताना अर्जदाराने खालील अटी पूर्ण केलेल्या पाहिजेत.

1) अर्जदाराचे वय अर्ज देतेवेळी 21 वर्षे पूर्ण असले पाहिजे.

2) अर्जदार हा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अटी व नियम 1950 चे कलम 56(ग) अन्वये अपात्र असता कामा नये. अर्जदाराने स्वत: स्वाक्षरी करुन अर्ज संस्थेच्या कार्यकारी मंडळाकडे दिला पाहिजे.

3) अर्जदाराने अर्जासोबत सभासद फी म्हणून रक्कम रु. 5001/- संस्थेकडे रोख भरली पाहिजे.

4) अर्जदारान सदस्यत्वाचे अर्जासोबत संस्थेच्या हिताचे काम करण्याबद्दलचे व संस्थेचे कोणतेही अहित करणार, चिंतणार नसल्याबद्दल प्रतिज्ञापत्र दिले पाहिजे.

16) **सभासदांचे प्रकार** :-

अ) **आजिव सभासद** :- सदर संस्था स्थापन करताना जे सभासद आहेत, ते संस्थेचे आजिव सभासद राहतील.

ब) **हितचिंतक सभासद** :- कोणत्याही नागरीकास संस्थेचे हितचिंतक सभासद म्हणून होता येईल. मात्र त्यासाठी कार्यकारी मंडळाने मान्यता देणे आवश्यक आहे.

क) **सल्लागार सभासद** :- कार्यकारी मंडळ निवडतील व मान्यता देतील त्या जेष्ठ अनुभवी तज्ञ साहित्यीक इसमांची सल्लागार म्हणून नेमणूक करतील.

..4/-

Principal
Four-S English Medium School

JOINT SUB-REGISTRAR OF HAVELI NO.18

हवल - १८
७२ | ८८
२०१५ (२)

17) **सभासदांचे हक्क व कर्तव्य** :-

1) **आजिव सभासद** :-

अ) संस्थेचे आजिव सभासद हे संस्थेचे अगर उपसंस्थेचे कार्य उन्नती होण्यासाठी अंग मेहनतीने कार्य करतील.

ब) आजिव सभासद यांना राजीनामा दिल्याखेरीज त्यांचे सभासदत्व रद्द करता येणार नाही. आजिव सभासदाने संस्थेच्या हिताविरुध्द अगर संस्थेची बदनामी करुन अहित कृती केल्यास त्यास आजिव सभासदांचे बहुमताने काढून टाकण्यात येईल.

क) संस्थेच्या आजिव सभासदाने बहुमताने घेतलेले निर्णय हा अंतिम निर्णय राहणार आहे.

2) **हितचिंतक सभासद** :-

अ) कलम 13 मध्ये नमूद केलेले सभासद हे संस्थेचे हितचिंतक सभासद असून त्यांना संस्थेचे सर्वसाधारण सभेमध्ये हजर राहून मतदान करण्याचा हक्क व अधिकार राहिल.

ब) **हितचिंतक सभासद** :- हे संस्थेच्या कार्यासाठी व उन्नतीसाठी व हितासाठी कार्य करतील. तसेच संस्थेच्या हितासाठी व उन्नतीसाठी सुचना योजना कार्यकारी मंडळासमोर मांडतील.

क) सभासदांना संस्थेचे दैनंदिन कार्यामध्ये सुचना करण्याचा हक्क राहणार आहे.

ड) हितचिंतक सभासदाने संस्थेच्या विरुध्द कोणतीही कृती करता कामा नये. तसेच संस्थेचे अहित होईल असे कोणतेही कृती अथवा वर्तन करण्याचे नाही.

इ) संस्थेच्या चाललेल्या कामकाजाची हितचिंतक सभासदास माहिती घेता येईल.

ई) हितचिंतक सभासदाने कार्यकारी मंडळ जे काम सोपवेल ते पूर्ण केले पाहिजे.

3) **सल्लागार सदस्य** :- सल्लागार सदस्य हे संस्था चालविण्याचे दृष्टीने मार्गदर्शन, सुचना करतील. मात्र त्यांना कार्यकारी मंडळावर निवणून येण्यासाठी उभे राहता येणार नाही व मतदान करता येणार नाही. मात्र कार्यकारी मंडळाचे सर्वसाधारण सभेस हजर राहून सुचना, सल्ले, मार्गदर्शन करता येईल.

18) **सभासदाचे अर्ज नाकारणे किंवा स्विकारणे याबाबत अधिकार** :-

हितचिंतक सभासदाचे अर्ज व सभासदत्व मंजूर करणे अथवा नाकारणे याचे सर्व

..5/..

Principal
Four-S English Medium School

अधिकार कार्यकारी मंडळाचे राहतील. सभासदत्व कार्यकारी मंडळाने नाकारल्यास हितचिंतक सभासदाने भरलेले पैसे परत दिले जाईल.

19) **सभासदत्व रद्द करणेबाबत :-**

1) संस्थेच्या हितसंबंधात बाधा येईल असे कोणतेही कृत्य केल्यास, कार्यकारणी सभासदत्व रद्द होईल.

2) सभासदाने कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा केल्यास कार्यकारीणी सभासदत्व रद्द करील.

3) सभासद नादार ठरल्यास कार्यकारीणी सभासदत्व रद्द करील. सभासदत्व रद्द करण्यापुर्वी संबंधीत सभासदाला कार्यकारीणीसमोर आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली पाहिजे.

20) **आजिव सभासद :-**

1) श्री. अशोकराव कोंडीबा येनपुरे.
2) श्री. नंदकुमार गोपाळ कुलकर्णी.
3) श्री. जयंतीशेठ ताराचंद ओसवाल.
4) श्री. सुनिल पंढरीनाथ काळोखे.
5) श्री. अशोक बाळकृष्ण मोरे.
6) सौ. सुनिता चंद्रकांत टिळेकर.
7) सौ. नंदिनी सुनिल काळोखे.
8) श्री. सदाशिव विष्णू मगर.
9) श्री प्रकाश दामोदर हिंगाळेकर

वरील प्रमाणे संस्थेचे आजिव सभासद राहणार आहेत.

21) **कार्यकारी मंडळ :-**

1) संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी एक कार्यकारी मंडळ असेल व त्यांची सदस्य संख्या 11 राहिल.

2) कार्यकारी मंडळाचे खालील प्रमाणे पदाधिकारी राहतील –

अ) अध्यक्ष – 1
ब) उपाध्यक्ष – 1
क) सेक्रेटरी – 1
ड) कोषाध्यक्ष – 1
इ) सदस्य – 9 आजिव + 3 हितचिंतक सभासद = 11 सदस्य

असे एकूण 11 सदस्यांची कार्यकारीणी राहणार आहे.

Principal
Four-S English Medium School

JOINT SUB-REGISTRAR OF HAVELI NO.18

हवेली - १८
९७७१/१४ | ३८
२०१५



वरील प्रमाणे कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी राहणार असून, यामध्ये वाढ करावयाची असल्यास सर्वसाधारण सभेमध्ये ठराव होऊन व त्यास आजिव सभासदांची मान्यता घेऊन वाढ करता येईल.

22) कार्यकारी मंडळाची मुदत :-

कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य पाच वर्षांचे मुदतीपर्यंत संस्थेचा कारभार पाहतील व अधिकारावर राहतील. परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे किंवा धर्मादाय आयुक्त अगर शासनाचे आदेशानुसार कार्यकारी मंडळाची निवडणूक होऊ शकली नाही तर निवडणूक होईपर्यंत पुर्वीचेच कार्यकारी मंडळ संस्थेचा कारभार पाहतील व त्यांनी घेतलेले निर्णय हे विधीसंमत असतील.

23) वार्षिक सर्वसाधारण सभा :-

अ) कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या तारखेस, वेळेस व ठिकाणी संस्थेची वर्षातून एकदा सर्वसाधारण सभा बोलावली पाहिजे. सर्वसाधारण सभेची नोटीस सरचिटणीसाने अध्यक्षांच्या सहीने सदस्यांना त्यांचे रजिस्टरमधील पत्त्यावर प्रत्यक्ष व जर प्रत्यक्ष भेटला नाही तर रजिस्टर पोस्ट ए.डी. किंवा कुरियरने पाठविली पाहिजे. सर्वसाधारण सभेची नोटीस सभेच्या तारखेपूर्वी 11 दिवस अगोदर दिली पाहिजे.

ब) अत्यंत महत्वाच्या कामासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अध्यक्ष सर्वसाधारण सभा एक किंवा अनेक वेळा वरील तरतुदीस अधिन राहून बोलावता येईल.

24) विशेष सर्वसाधारण सभा :-

कार्यकारी मंडळाने ठरविल्यास किंवा संस्थेच्या सभासदांपैकी 1/5 सदस्यांची लेखी मागणी केल्यास अगर धर्मादाय आयुक्त, उपायुक्त अगर सहा. आयुक्त यांचेकडून सुचना आल्यास विशेष सर्वसाधारण सभा बोलावली जाईल. अशी सभा शक्य तितक्या लवकर बोलावण्यात येईल. विशेष सर्वसाधारण सभअ ज्या विषयासाठी बोलावण्यात येईल त्या विषयांव्यतिरिक्त इतर विषयांवर चर्चा अगर निर्णय घेता येणार नाही. विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्याची नोटीस वेळ अपुरा असल्यास तीन दिवस अगोदर देऊन बोलाविता येईल.

Principal
Four-S English Medium School

..7/-

(7)

25) <u>कार्यकारी मंडळाची निवड :-</u>

अ) कार्यकारी मंडळामध्ये आजिव सभासद हे कायमस्वरुपी राहणार असून हितचिंतक सभासदांचेमधून तीन सभासद कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून निवडून घेण्याचे आहे.

ब) अशा हितचिंतक सभासदांमधून निवडून आलेले तीन कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून राहतील. अशा सदस्यांना कार्यकारी मंडळातील पदाधिकारावर निवडून येता येणार नाही.

क) आजिव सभासद व हितचिंतक सभासदांमधून आलेले तीन सभासद यांचे कार्यकारी मंडळ राहणार असून या कार्यकारी मंडळाचे सदस्यांमधून पदाधिका-याच्ची निवड बहुमताने करण्यात येईल. अशी निवड हात वर करुन अथवा गुप्त मतदान पध्दतीने केली जाईल.

26) <u>कार्यकारी मंडळाची सभा :-</u>

संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सभा प्रत्येक महिन्यात घेण्याते येईल. सदर सभेची सुचना कार्यकारी मंडळातील सदस्यांना व पदाधिका-यांना पाच दिवस अगोदर दिली पाहिजे. सदर सभा सचिव किंवा अध्यक्ष यांचे सुचनेनुसार घेण्यात येईल. कार्यकारी मंडळातील निर्णय हा बहुमताने घेण्यात येईल. समान मते पडल्यास अध्यक्षांचा निर्णय व मत अंतिम व निर्णायक राहिल. तसेच तातडीचे कामासाठी अध्यक्ष अगर सचिव यांना कार्यकारी मंडळाची सभा 24 तासाची पूर्व सुचना देऊन बोलावता येईल.

27) <u>सर्वसाधारण सभा :-</u>

अ) संस्थेची सर्वसाधारण सभा वर्षातून एकदा साधारणत: मे महिन्यामध्ये घेण्यात येईल. या सभेस आजिव तसेच हितचिंतक सभासद हजर राहतील.

ब) <u>सर्वसाधारण सभेची कामे :-</u>

1) पाच वर्षांसाठी हितचिंतक सभासदांमधून तीन सभासद कार्यकारणीसाठी निवडून देणे.

2) वार्षिक अहवाल मंजूर करणे व संस्थेचे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करणे, संस्थेच्या विकासासाठी प्रस्ताव मांडून मंजूर करणे.

3) संस्थेच्या घटनेंत दुरुस्ती, उपदुरुस्ती करणे व त्याची अंमलबजावणी करणे, नियम, अनियम तयार करुन मंजूर करणे.

4) संस्थेच्या झालेल्या खर्चास मंजूरी देणे, कार्यकारी मंडळाचे कामावर लक्ष ठेवणे.

Principal
Four-S English Medium School

दस्त क्र. - २८
हवेली १९ ३८
२०९५ (8)

ब) संस्थेच्या उन्नतीसाठी सुचना प्रस्ताव देऊन त्यासाठी कार्यरत राहणे. त्यासाठी संस्थेच्या समित्या, उपसमित्या, प्रतिनिधी मंडळ नेमणे.

क) सर्वसाधारण सभेमध्ये मतदान घेण्याची वेळ आल्यास सदस्यचे मतदान हात उंच करुन घेण्यात येईल किंवा एखाद्या सदस्याने गुप्त मतदानाची मागणी केल्यास मतदान गुप्त पध्दतीने घेण्यात येईल.

ड). सर्वसाधारण सभेमध्ये अध्यक्षपद कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष यांचेकडे राहिल. अध्यक्ष उपस्थित नसल्यास उपाध्यक्ष अध्यक्ष म्हणून कार्य करतील.

इ) मतदान समसमान झाल्यास अध्यक्षाचे मत व निर्णय अंतिम राहणार आहे.

28) सर्वसाधारण सभेची गणसंख्या :-

सर्वसाधारण सभेसाठी 3/5 पेक्षा जास्त सभासद हजर राहिल्यास सभेचा कोरम पूर्ण झाला आहे असे समजण्यात येईल.

29) कार्यकारी मंडळाचे सभेतील गणसंख्या :-

कार्यकारी मंडळाचे सभेसाठी कार्यकारी मंडळातील निम्म्यापेक्षा जास्त सभासद हजर राहिल्यास सभेचा कोरम झाला आहे असे समजण्यात येईल.

परंतु वरील दोन्ही सभा कोरम अभावी तहकुब झाल्यास त्याच सभा अर्ध्या तासानंतर हजर असणा-या गणसंख्येत घेतली जाईल. अशा सभेस तहकुब सभा असे समजले जाईल. तहकुब सभेचे कामकाज नियमानुसार ~~तहकुब~~ सुरु केले जाईल. तहकुब सभेमध्ये झालेले कामकाज व निर्णय ह कायदेशीर व विधीसंमत समजले जाईल.

30) कार्यकारी मंडळाची कर्तव्ये :-

सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर झालेले निर्णय अंमलात आणण्यासाठी कार्यवाही करणे, तसेच संस्थेचे उद्देश व ध्येय पूर्ण करण्यासाठी निरनिराळ्या योजना आखून त्यास सर्वसाधारण सभेची मंजूरी घेऊन त्यास कार्यान्वीत करणे, संस्थेच्या कार्यासाठी, ध्येयपूर्तीसाठी च उद्दिष्टांसाठी वेगवेगळ्या मार्गाने निधी गोळा करणे व त्याचा विनियोग संस्थेच्या ध्येयपूर्तीसाठी करणे, संस्थेसाठी स्थावर, जंगम मालमत्ता खरेदी करणे, भाड्याने घेणे, देणे व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा 1950 चे कलम 36 यांस अधिन राहून मालमत्ता गहाण ठेवणे, बक्षिस देणे, विकसीत करणे, खरेदी व विक्री करणे त्यासाठी रजिस्टर व अनरजिस्टर्ड करार-मदार करणे, पैसे देणे-घेणे, संस्थेचे अंदाज पत्रक तयार करणे, संस्थेच्या जमाखर्चावर नियंत्रण ठेवणे, संस्थेचे, उपसंस्थेचे कामकाज पाहणे. संस्थेच्या कार्यक्षेत्रात निरनिराळ्या शाखा उभारणे, संस्थेचे, उपसंस्थेचे कामकाज चालविण्यासाठी कर्मचारी, शिक्षक, तंत्रज्ञ, मजूर इत्यादींची नेमणूक करणे,

..9/-

Principal
Four-S English Medium School

त्यांचे वेतन ठरविणे, तक्रार झाल्यास अथवा कर्मचारी संस्थेचे अहित केल्यांस वा कृती केल्यास त्यास कामावरुन काढून टाकणे, संस्थेच्या निर्णयाचे पालन करणे न केल्यास कर्मचा-यां सेवकांविरुध्द चौकशी आयोग नेमणे.

31) संस्थेच्या निरनिराळ्या शाखेवर नियंत्रण, त्यांच्यासाठी नियमावली तयार करणे, दर पाच वर्षांनी झालेल्या सभासदांचे यादी तसेच निवडलेल्या कार्यकारी मंडळाची यादी धर्मादाय आयुक्त, पुणे यांचेकडे पाठविणे, सदस्यांची यादी अद्यावत ठेवणे.

जमाखर्च हिशेब अद्यावत ठेऊन लेखा परिक्षण करुन घेणे, लेखा परिक्षणातील सुचन, त्रुटी पूर्ण करणे, सदरचा लेखा परिक्षण अहवाल मा. धर्मादाय आयुक्त अथवा योग्य त्या लेखा अधिका-यांकडून मंजूर करुन घेणे,

संस्थेचा दैनंदिन कारभार व्यवस्थित चालविण्याकरीता ठराव निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणे.

काही विशिष्ट कामासाठी कार्यकारी मंडळातील एक किंवा अनेक सदस्यांना अथवा पदाधिका-यांना त्या विशिष्ट कामासाठी अधिकार देणे व त्या कामाची पूर्तता करुन घेणे.

संस्थेच्या उन्नतीसाठी कायद्याच्या दृष्टीने निरनिराळी कामे करणे, घटना दुरुस्तीबाबत निर्णय घेणे, संस्थेचे कार्यालय बदलणे, पत्ता बदलणे व तशा सुचना योग्य त्या अधिका-यांकडे पाठविणे.

संस्थेच्या कामासाठी फर्निचर, लेखन साहित्य, यंत्र सामुग्री खरेदी करणे किंवा संस्थेमध्ये निर्माण होणा-या साहित्याची विक्री करणे.

संस्थेच्या हिशोबासाठी अंतर्गत हिशोब तपासणीस यांची नेमणूक करणे. सदस्य स्विकारण्यास मान्यता देणे अगर स्विकारणे, सल्लागार सदस्यांची नेमणूक करणे, त्यांनी दिलेला सल्ला अंमलात आणण्याचा प्रयत्न करणे.

कोर्ट- कचे-यांची कामे पाहाणे, सरकारी, निमसरकारी अधिका-यांसमोर दावे चालविणे, दावे दाखल करणे, दावे मागे घेणे, तडजोड करणे, वकील, प्रतिनिधी यांची नेमणूक करणे.

शैक्षणिक साहित्य छापणे, ते प्रसिध्द करणे, मासिक, पाक्षिक काढणे, अहवाल प्रसिध्द करणे, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन पुस्तिका तयार करणे, ते प्रसिध्द करणे, त्यांची विक्री करणे, विदेशी शैक्षणिक साहित्य आणणे इत्यादी.

संस्थेच्या उन्नतीसाठी व उत्कर्षासाठी जे जे कायदेशीर धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील ते घेऊन त्यांची कार्यवाही करणे.

..3/

Principal
Four-S English Medium School

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR OF HAVELI NO.10

हवेली - १०
दस्त क्र. १८८ / ३८
२०२५



32) उपसमित्या, उपशाखा व त्यांची कर्तव्ये :-

संस्थेचे कामकाज व्यवस्थित चालावे म्हणून व उपसमित्या उपशाखांची निर्मीती करुन कामाचे विकेंद्रीकरण व्हावे म्हणून कार्यकारी मंडळाच्या सदस्यातून समिती, उपसमिती तीनपेक्षा कमी नाही इतक्या सदस्यांचे एक किंवा अनेक समित्या, उपसमित्या यांची नेमणूक करण्यात येईल. समित्या, उपसमित्या नेमल्यानंतर त्यांना दिलेल्या कामाची पूर्तता झाल्यानंतर अशा समित्या, उपसमित्या बरखास्त करण्यात येईल. समिती, उपसमिती यांनी केलेली कामे कायदेशीर मार्गाने व नियमानुसार केली पाहिजे. उपसमितीत सदस्यांना अधिकार व नियम कार्यकारी मंडळ घालून देईल.

Principal
Four-S English Medium School

भाग - 3

## - पदाधिका-यांची कर्तव्ये -

**अविश्वासदर्शक ठराव राजीनामा, मृत्यु, गैरवर्तन रिक्त जागा भरणे इत्यादी.**

1) **पदाधिका-यांची कार्यकारी मंडळातील कर्तव्ये** :- पदाधिका-यांची कार्यकारी मंडळातील कर्तव्ये पुढीलप्रमाणे -

1) **अध्यक्ष** -

अ) सर्वसाधारण सभा विशेष सर्वसाधारण सभा, कार्यकारी मंडळाची सभा, यांच्या सभेचे अध्यक्ष स्थान सांभाळून संस्थेचे कामकाज पार पाडणे व योग्य निर्णायक मत देणे.

ब) संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.

क) संस्थेची उन्नती व भरभराट होईल यासाठी प्रयत्न करणे व योग्य ते निर्णय घेणे, तसेच संस्थेचा नावलौकीक वाढेल यासाठी प्रयत्न करणे.

ड) कोषाध्यक्ष यांच्या बरोबरीने व सचिवाच्या सल्लामसलतीने संस्थेच्या जमाखर्चावर देखरेख ठेवणे, अनावश्यक खर्च टाळण्यासाठी मार्गदर्शन करणे.

इ) संस्थेचे संयुक्तीकरित्या बँक खाते चालविणे.

2) **उपाध्यक्ष** - अध्यक्षांच्या गैरहजेरीत त्यांची कामे व कर्तव्ये पार पाडणे.

3) **चिटणीस** -

अ) अध्यक्षांच्या सल्ल्याने व संस्थेचे ध्येय धोरण अंमलात आणण्यासाठी कामकाज पाहणे.

ब) सर्वसाधारण सभेने अथवा कार्यकारी मंडळाने जे निर्णय घेतले असतील त्याची अंमलबजावणी करणे.

क) संस्थेचे दप्तर, हिशेब, निधी, मालमत्ता आदींची व्यवस्था पाहाणे.

ड) संस्थेचे सेवक, नोकरवर्ग यांचेवर नियंत्रण ठेवणे, सेवा नियमांची अंमलबजावणी करुन घेणे.

इ) अंदाजपत्रक तयार करुन ते कार्यकारी मंडळ व सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ ठेवणे.

ई) संस्थेचा मागील वर्षाचा जमाखर्च कार्यकारी मंडळापुढे तसेच सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणे, त्या संदर्भात त्रुटी व शंका यांचे निरसन करणे, संस्थेच्या

..12/-

Principal
Four-S English Medium School

JOINT SUB-REGISTRAR OF HAVELI NO.18

हवेली - १८
१७७१ २० | ३८
२०९३



जमाखर्च व अंदाजपत्रकाचे लेखा परिक्षण करुन घेणे, तसेच वार्षिक अहवाल तयार करुन तो सर्वसाधारण सभेपुढे अध्यक्षांचेवतीने ठेवणे.

उ) संस्थेचा सर्व पत्रव्यवहार पहाणे, नोंदवह्या, दप्तर कागदपत्र योग्य त्या रितीने ठेवणे व कार्यकारी मंडळाने मागणी केल्यास त्या दाखविणे.

ऊ) संस्थेच्या कायदेशीर बाबींमध्ये पूर्तता करणे व संस्थेच्या वतीने सरकारी, निमसरकारी शैक्षणिक अधिका-यांपुढे हजर होणे, तसेच सरकारी, निमसरकारी विभागाकडून संस्थेच्या कायदेशीर परवानग्या मिळविणे व शैक्षणिक संस्थेशी संपर्क ठेवणे, पत्रव्यवहार ठेवणे, परवानग्या घेणे इत्यादी.

ग) संस्थेच्या उपशाखांवर नियंत्रण ठेवणे.

घ) संस्थेच्या व शाखांच्या ध्येयपूर्तीसाठी निरनिराळ्या योजना आखणे, चर्चासत्र, प्रात्यक्षिक करणे, प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणे, स्पर्धा आयोजित करणे.

ट) कार्यकारी मंडळाच्या सुचनेनुसार सभा बोलविणे, सभेची कामकाजाची नोंद ठेवणे इ.

4) <u>कोषाध्यक्ष</u> -

अ) संस्थेचा निधी सांभाळणे, व हिशेबावर देखरेख ठेवणे तसेच संस्थेचे बँक खाते संयुक्तिकरित्या व कार्यकारी मंडळ ठरवेल त्याप्रमाणे चालविणे.

ब) संस्थेच्या वार्षिक अहवाल व लेखा परिक्षणास जमाखर्चाची सर्व माहीती देणे इत्यादी.

33) <u>बँकखाते</u> :- बँकेचे खाते/ खाती, अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांच्या सह्यांनी चालविण्याचे आहेत. त्यामध्ये सचिव, मुख्य अध्यक्ष, कोषाध्यक्ष यांचेपैकी कोणाही एकाची अशा दोन किंवा तिघांचे सह्यांनी बँक खाते/ खाती चालविण्याची आहेत.

